**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**माहिती व जनसंपर्क विभाग**
**प्रेसनोट**

- **मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली "गणेशोत्सव 2025" आढावा बैठक संपन्न.**
- **मिरा भाईंदर महानगरपालिका व पोलीस प्रशासनाच्या नियमांचे पालन करून गणेशोत्सव साजरा करण्याचे महानगरपालिका मा. आयुक्त यांचे आवाहन**

"गणेशोत्सव 2025" च्या पार्श्वभूमीवर दि. 28 जुलै 2025 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांनी गणेशोत्सव सण अधिक प्रभावी, शिस्तबद्ध व पर्यावरणपूरक रीतीने पार पाडण्याच्या उद्देशाने मनपाच्या सर्व विभाग, पोलिस प्रशासन, वाहतूक पोलिस व अग्निशमन दल प्रमुख यांच्या समवेत आढावा बैठक स्वर्गीय कल्पना चावला अग्निशमन केंद्र प्रभाग समिती क्र. १ येथील सभागृहात घेतली. मिरा भाईंदर शहरात दरवर्षी मोठ्या प्रमाणावर गणेशोत्सव साजरा केला जातो. गणेशोत्सव सणाचे व्यवस्थापन अधिक नियोजनपूर्वक असावे, या हेतूने ही बैठक घेण्यात आली होती. बैठकीत सर्वप्रथम यंदाच्या गणेशोत्सवासाठी महापालिकेच्या विविध यंत्रणांनी केलेल्या पूर्वतयारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. सदर बैठकीस अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे, अतिरिक्त आयुक्त प्रियंका राजपूत, पोलिस उपायुक्त (मुख्यालय) अशोक विरकर, उपायुक्त (मुख्यालय) कल्पिता पिंपळे, उपायुक्त डॉ. सचिन बांगर, उपायुक्त कविता बोरकर, शहर अभियंता दिपक खांबित, सहा. आयुक्त सोहेल शेख, प्रभाग 1 ते 6 चे सहाय्यक आयुक्त, सर्व पोलिस स्टेशनचे अधिकारी, तसेच महापालिकेचे विभागप्रमुख / संबंधित अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

मिरा भाईंदर शहरातील सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी महानगरपालिकेच्या नियमांचे काटेकोर पालन करणे अनिवार्य राहणार आहे. मंडप उभारण्याची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक आहे. यासाठी महापालिकेने दरवर्षीप्रमाणे प्रभागनिहाय 'एक खिडकी योजना' सुरू राहणार आहे. या योजनेतून मंडळांना महानगरपालिका, पोलीस प्रशासन, वाहतूक पोलीस व अग्निशमन दल यांच्या अटी व शर्ती आणि सूचनांचे पालन करण्याच्या अटीवर विनामूल्य परवानग्या दिल्या जातील. गणेश मूर्तींच्या विसर्जनासाठी शहरातील नैसर्गिक तसेच कृत्रिम तलावांची निवड, स्वच्छता, सजावट व सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना याविषयी सविस्तर चर्चा झाली. महापालिकेच्या वतीने सर्व गणेश मंडळांना आणि नागरिकांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी महानगरपालिकेच्या नियमांचे पालन करून, पर्यावरणपूरक व सुरक्षित गणेशोत्सव साजरा करावा आणि पोलीस प्रशासनास व महापालिकेस आवश्यक सहकार्य करावे.